जनसंपर्क कक्ष
0 9 JUL 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘आनंदी श्रेष्ठत्व-ज्येष्ठत्व’चे प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे डॉ. आण्णासाहेब गुरव आणि श्रीकांत आडिवरेकर यांनी लिहिलेल्या ‘आनंदी श्रेष्ठत्व-ज्येष्ठत्व’ पुस्तकाचे प्रकाशन कणेरीमठाचे मठाधिपती काडसिद्धेश्वर स्वामी यांच्या हस्ते झाले.

विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र अधिविभागात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या अनुभवाच्या आधारे सामाजिक कार्यामध्ये योगदान द्यावे, नवी पिढी घडविण्यासाठीही मार्गदर्शन करावे, असे आवाहन काडसिद्धेश्वर स्वामी यांनी केले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, माणसाने चांगले आयुष्य जगण्यासाठी चांगल्या सवयी अंगी बाणवल्या पाहिजेत, असे सांगितले. यावेळी काडसिद्धेश्वर स्वामी आणि कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते ‘फेस्कॉम’च्या ‘मनोहारी मनोयुवा’ नियतकालिकाचेही प्रकाशन केले.

यावेळी डॉ. केदार मारुलकर, डॉ. डी. के. मोरे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. दीपा इंगवले उपस्थित होते.

महाराष्ट्र

# शिवाजी विद्यापीठात क्रीडाविषयक पदवी अभ्यासक्रम सुरु

कोल्हापूर, ता.८ (प्रतिनिधी)-

.........................................

शिवाजी विद्यापीठात चालू शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून बी.ए. (स्पोर्ट्स) हा क्रीडाविषयक नवीन त्रैवार्षिक पदवीस्तरीय अभ्यासक्रम चालू करण्यात येत आहे, अशी माहिती विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी दिली.

डॉ.बनसोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागामार्फत स्पोर्ट्स (क्रीडा) या विषयातील पदवीस्तरीय अभ्यासक्रम चालू करण्याचा प्रस्ताव विद्यापीठाच्या अधिकार मंडळांसमोर सादर केला होता. त्या प्रस्तावाला मान्यता प्राप्त झाली असून अधिविभागातच हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. बारावीनंतर लगेचच हा अभ्यासक्रम उपलब्ध होत आहे.

पदवीच्या शिक्षणानंतर बी.पी.एड., एम.पी.एड.अभ्यासक्रम यापूर्वी उपलब्ध असले तरी राज्यात पदवी स्तरावर प्रथमच अशा स्वरुपाचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध झाला आहे, या अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाबरोबरच संगणक, सामाजिक मूल्यशिक्षण, संज्ञापन कौशल्य, शारीरिक तंदुरुस्ती, क्रीडा मत्रकारिता, क्रीडा मानसशास्त्र, व्यक्तीमत्त्व विकास, सामाजिक शिक्षण, आहार व पोषण, योगा व ध्यानधारणा, पर्यावरणशास्त्र, आधुनिक क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा व्यवस्थापन या विषयांसह क्रीडाविषयक व्यापक प्रात्यक्षिक ज्ञानाचा समावेश आहे.